## निशाणी क्रमांक ०१ वर आदेश

१. अर्जदारांनी प्रस्तूतचा अर्ज हा बॉम्बे रेग्युलेशन अधिनियम, १८२७ चे कलम–२ नुसार वारस प्रमाणपत्र (Heirship certificate) मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराची थोडक्यात हकीकत अशी की, अर्जदार क्र.१ विजया बाळकृष्ण ताठे ही मयताची पत्नी, अर्जदार क्र.२ विलास बाळकृष्ण ताठे हा मयताचा मुलगा व अर्जदार क्र.३ रंजना सुरेश बडनेरकर ही मयताची मुलगी आहे. मयत **बाळकृष्ण जनार्धन ताठे** यांचे दि.१६/०६/२०२० रोजी भालेराव नर्सिंग होम, नागपूर येथे निधन झाले आहे. मयताची आई पुष्पा जनार्धन ताठे ही सन–१९७० मध्ये भोज वार्ड, भद्रावती, तह.भद्रावती, जि.चंद्रपूर येथे मृत पावली आहे. मयतास उपरोक्त वारस असून इतर कोणीही वारस नाहीत. अर्जदारांनी शासकीय कामकाजाकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. सदर प्रकरणात कोणाची काही हरकत आहे का ? याबाबत जाहीर प्रगटन निशाणी क्र.१७ वर 'दैनिक मराठी महाविदर्भ' या वर्तमानपत्रात दि.२२ फेब्रुवारी, २०२६ रोजी प्रसिध्द करण्यात आले होते. परंतु, अद्याप सदर प्रकरणात कोणाचीही काहीएक हरकत प्राप्त झाली नाही.

४. अर्जदार क्र.१ विजया बाळकृष्ण ताठे यांनी अर्जातील कथनांच्या पुष्ट्यर्थ निशाणी क्र.१० वर पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. अर्जदाराने सदर शपथपत्रामध्ये प्रस्तुत अर्जातील संपूर्ण मजकुराचा समावेश केलेला आहे. उपरोक्त वारसदार हेच मयताचे एकमेव वारस आहेत व त्यांच्याशिवाय इतर वारस नाहीत, असे नमुद केले आहे. अर्जदाराने मयताच्या मृत्यू प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत निशाणी क्र.१६ वर दाखल केली आहे. त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, मयत **बाळकृष्ण जनार्धन ताठे** यांचे दि.१६/०६/२०२० रोजी भालेराव नर्सिंग होम, नागपूर येथे निधन झाले आहे. तसेच मृतकाच्या मृत्यू प्रमाणपत्रात त्यांचा कायम स्वरुपी पत्ता हा भोज वार्ड, किल्ला गेट

समोर,भद्रावती, तह.भद्रावती, जि.चंद्रपूर असा नमुद असल्याचे दिसून येते. अर्जदाराने अर्जदार क्र.१ ते ३ तसेच मृतक बाळकृष्ण जनार्धन ताठे यांच्या आधारकार्डच्या पडताळणी प्रती अनुक्रमे नि.क्र.१२ ते १५ वर, पेपरमध्ये प्रकाशीत जाहीरनाम्याचे बिल नि.क्र.१८ वर अभिलेखावर दाखल केले आहे.

अर्जदारातर्फे सा.क्र.२ विलास बाळकृष्ण ताठे यांनी त्यांचे पुराव्याचे शपथपत्र नि.क्र.११ वर दाखल करुन ते मयत बाळकृष्ण जनार्धन ताठे यांचा मुलगा असल्याचे व अर्जदार क्र.१ ही मयत बाळकृष्ण जनार्धन ताठे यांची पत्नी व अर्जदार क्र.३ ही मयत बाळकृष्ण जनार्धन ताठे यांची मुलगी असल्याचे शपथेवर कथन केले आहे. त्यांनी मयत बाळकृष्ण जनार्धन ताठे हे दि.१६/०६/२०२० रोजी भालेराव नर्सिंग होम, नागपूर येथे मृत पावल्याचे कथन केले आहे. त्यांनी मयत बाळकृष्ण जनार्धन ताठे यांची आई मयत पुष्पा जनार्धन ताठे ही सन–१९७० मध्ये त्यांचे राहते घरी भोज वार्ड, भद्रावती येथे मयत झाल्याचे व मृत्यूचे वेळी ते हजर असल्याचे कथन केले आहे. त्यांनी अर्जदार क्र.१ ते ३ हे मयताचे वारस असुन मयतास त्यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही वारस नसल्याचे शपथेवर कथन केले आहे. अर्जदाराने नि.क्र.१९ वर पुरसीस दाखल करून पुरावा बंद केला आहे.

५. अर्जदाराने दिलेल्या पुराव्यास कोणीही आव्हान दिलेले नाही. त्यामुळे अर्जातील कथनावर अविश्वासे ठेवण्याचे कोणतेही कारण नाही. उपरोक्त वारसदारांचे मयताशी असलेले नातेसंबंध विचारात घेता असे दिसून येते की, उपरोक्त वारसदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे अर्ज मंजूर करणे योग्य व न्यायोचित आहे. सबब, मी पुढील आदेश करीत आहे;

**आदेश**

१) अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) अर्जदार क्र.१ **विजया बाळकृष्ण ताठे**, अर्जदार क्र.२ **विलास बाळकृष्ण ताठे** व अर्जदार क्र.३ **रंजना सुरेश बडनेरकर** हे मयत **बाळकृष्ण जनार्धन ताठे** यांचे वारस असल्याचे घोषीत करण्यात येते.

३) सिव्हील मॅन्युअल प्रकरण–१४ मधील परिच्छेद–३१२ प्रमाणे मूळ वारस प्रमाणपत्रावर टीप नमूद करावी.

४) अर्जदाराने आवश्यक ते मुद्रांक शुल्क भरल्यानंतर वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

(आदेश खुल्या न्यायालयात जाहीर केला असे.)

Digitally signed by JARUDE ASHWINI SHRIKANT
Date: 2026.04.10 19:45:42 +0530

**(ए.एस. जरुदे)**

दिनांकः– १०/०४/२०२६. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), भद्रावती